गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## निधोना येथील सिमेंट नाला बांधाचा प्रस्ताव दोन वर्षांपासून प्रलंबित; मंजुरीसाठी चिरीमिरीची मागणी झाल्याचा आम आदमी पक्षाचा गंभीर आरोप

*जिल्हा जलसंधारण अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर टाळाटाळ केल्याचा आरोप; चौकशी करून प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा*

**जालना । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे निधोना येथील सिमेंट नाला बांध (सीएनबी) कामाचा प्रस्ताव सुमारे दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करत आम आदमी पक्षाचे तालुकाध्यक्ष सुभाष बोर्ड यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी



तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत संबंधित प्रस्तावाला जाणीवपूर्वक मंजुरी दिली जात नसल्याचा तसेच मंजुरीसाठी आर्थिक चिरीमिरीची मागणी होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रार निवेदनानुसार, निधोना ग्रामपंचायतीने सिमेंट नाला बांध (सीएनबी) उभारणीसाठी ठराव मंजूर केला होता. त्यानंतर या कामाचा प्रस्ताव २३ जानेवारी २०२४ रोजी जिल्हा परिषदेअंतर्गत उपविभागीय जलसंधारण विभागाकडे सादर करण्यात आला. मात्र, दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही या प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात *(पान २ वर)*

## महापौर, उपमहापौर व आयुक्तांचा पूरग्रस्त भागांचा पाहणी दौरा; पाणी निचऱ्यासाठी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

मुसळधार पावसानंतर गायत्रीनगर, कोठारीनगर, महेशनगर व हनुमान घाट परिसराची प्रत्यक्ष पाहणी; जलनिस्सारण व्यवस्था सुधारण्यावर भर

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी बुधवारी प्रभाग क्रमांक १ व २ मधील पूरग्रस्त भागांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करून परिस्थितीचा आढावा घेतला.



यावेळी महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांनी गायत्रीनगर, कोठारीनगर, महेशनगर आणि हनुमान घाट परिसराला भेट देऊन पावसामुळे निर्माण झालेल्या समस्यांची पाहणी केली. अनेक ठिकाणी रस्त्यांवर आणि घरांच्या परिसरात पाणी साचल्याने नागरिकांना ये-जा करण्यास अडचणी निर्माण झाल्या असून काही घरांमध्येही पाणी शिरल्याचे निदर्शनास आले. नागरिकांशी थेट संवाद; समस्या जाणून घेतल्या

पाहणीदरम्यान नागरिकांनी प्रशासनासमोर आपल्या अडचणी मांडल्या. पावसाचे पाणी घरात शिरणे, नाल्यांमधील अडथळे, गटारे तुंबणे, रस्त्यांवर साचलेले पाणी आणि जलनिस्सारण व्यवस्थेतील त्रुटी याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या. प्रशासनाने या समस्या गांभीर्याने ऐकून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. महापौर वंदना मगरे यांनी नागरिकांशी संवाद साधताना, पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी महानगरपालिका प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून कोणत्याही *(पान २ वर)*






# संपादकीय...

## विकासकामांच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह

जालना शहरातील राजूर चौफुली उड्डाणपुलापासून ढवळेश्वरकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याच्या कामाबाबत निर्माण झालेला वाद हा केवळ एका रस्त्यापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न सार्वजनिक बांधकामांच्या गुणवत्तेचा, शासकीय निधीच्या परिणामकारक वापराचा आणि कामकाजावरील देखरेखीच्या यंत्रणेचा आहे. रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला होण्यापूर्वीच त्यावर तडे गेल्याचे, खडी उघडी पडल्याचे आणि खड्डे निर्माण झाल्याचे आरोप होत असतील, तर त्या आरोपांची निष्पक्ष तांत्रिक तपासणी होणे ही लोकशाही व्यवस्थेची किमान अपेक्षा आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी या प्रकरणात गंभीर आरोप करत चौकशीची मागणी केली आहे. त्यांनी हा विषय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निदर्शनास आणण्याची भूमिकाही जाहीर केली आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधीला विकासकामांबाबत प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार आहे. मात्र त्याचवेळी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कंत्राटदार यांची अधिकृत बाजूही समोर येणे तितकेच आवश्यक आहे. कारण सार्वजनिक चर्चेचा पाया आरोप किंवा प्रत्यारोप नव्हे, तर वस्तुनिष्ठ तपासणी असायला हवा. सार्वजनिक बांधकामांमध्ये गुणवत्ता नियंत्रणासाठी बहुस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आहे. काम सुरू असताना अभियंत्यांची नियमित पाहणी, प्रयोगशाळांमधील साहित्य चाचण्या, मोजमाप पुस्तिका, गुणवत्ता नियंत्रण अहवाल आणि अंतिम तांत्रिक प्रमाणपत्र अशा अनेक टप्प्यांतून प्रत्येक काम पूर्ण होणे अपेक्षित असते. या सर्व प्रक्रिया काटेकोरपणे पार पडत असतील, तर काम पूर्ण होण्यापूर्वीच अशा स्वरूपाच्या तक्रारी का निर्माण होतात, हा प्रश्न प्रशासनाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. पावसाळा हा कोणत्याही रस्त्याच्या गुणवत्तेची पहिली परीक्षा मानला जातो. अनेकदा सुरुवातीच्या पावसात किरकोळ दोष दिसून येतात आणि ते दोष दुरुस्ती कालावधीत ( ) दुरुस्त केले जातात. परंतु जर हे दोष संरचनात्मक स्वरूपाचे असतील किंवा कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित करत असतील, तर केवळ वरवरची दुरुस्ती करून विषय संपविणे योग्य ठरणार नाही. स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून दोषांचे मूळ कारण शोधणे आवश्यक ठरते. यापूर्वीही राज्यातील विविध भागांत नव्याने बांधलेल्या रस्त्यांवर पावसाळ्यात खड्डे पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. प्रत्येक वेळी चौकशीची घोषणा होते, दोषींवर कारवाईचे आश्वासन दिले जाते; मात्र अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतात. याचा अर्थ गुणवत्ता नियंत्रणाच्या यंत्रणेत काही मूलभूत त्रुटी आहेत का, याचाही विचार होणे आवश्यक आहे. शासन दरवर्षी रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधांवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. हा निधी नागरिकांच्या करातून उभा राहतो. त्यामुळे प्रत्येक रुपयामागे उत्तरदायित्व असणे अपरिहार्य आहे. नागरिकांचा प्रश्न केवळ ‘‘रस्ता झाला का?‘‘ एवढाच नसून ‘‘रस्ता किती टिकाऊ आणि सुरक्षित झाला?‘‘ हाही आहे. या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाने मौन न बाळगता वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे. संबंधित कामाची सद्यस्थिती काय आहे? काम पूर्ण झाले आहे की अद्याप सुरू आहे? तक्रारींची पाहणी करण्यात आली आहे का? तांत्रिक अहवाल काय सांगतो? दोष आढळल्यास कंत्राटदाराकडून दुरुस्ती करून घेतली जाणार का? अशा प्रश्नांची अधिकृत उत्तरे नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. पारदर्शकता हीच अशा वादांवरची सर्वात प्रभावी उपाययोजना ठरते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे राजकीय आरोप आणि प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन या प्रकरणाचा विचार होणे आवश्यक आहे. निकृष्ट दर्जाचे काम झाले असेल, तर दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. परंतु आरोप तथ्यहीन ठरल्यास तेही तितक्याच स्पष्टपणे जनतेसमोर आले पाहिजे. कारण विकासकामांवरील विश्वास टिकविण्यासाठी सत्य समोर येणे अत्यावश्यक आहे.

दैनिक युवा आदर्श दि. ०६-०८-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
**JAVED NATHANI**
To New Name
**JAVED RAJJAK NATHANI**
For Passport Issuence
Add- Near Naeem Kirana, Pentionpura,
Jalna. 431203.

## पाटोदा शाळेच्या वतीने बोराडे यांचा सत्कार



**जालना - प्रतिनिधी**

केंद्रीय मुख्याध्यापक श्री आर. पी. बोराडे हे ३१ जुलै २०२६ रोजी शिक्षण विभागातील ४० वर्षांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त ४ ऑगस्ट २०२६ रोजी मंठा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा यांच्या वतीने मुख्याध्यापक श्री संतोष तोटेवाड, प्राथमिक शिक्षक श्री गंगाधर वानोळे व श्री देविदास मामीलवार यांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी श्री बोराडे यांच्या शिक्षण क्षेत्रातील मोलाच्या योगदानाचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या निरोगी, आनंदी व यशस्वी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# सावधान!राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररूप पहाता; संभाव्य दुर्घटनांपासुन स्वतःला सांभाळा.

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग,शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय,वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे.याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले,तलाव,डोह,रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव,पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते.याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय.आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे.परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे.त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी,भुकंप,अती पाऊस,अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे.कारण वाढते सिमेंट रोड,शहरीकरण,औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासुन २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते.यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून.त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते.असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत.कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुपटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला.

भंडारा आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगारामवाडी परिसरातील ‘‘कोहिनूर‘‘ही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते.म्हणजे आपण ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते.परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण,खाणी, औद्योगीकरण,रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले?जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा.राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची!याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल.आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे.

त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे.तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते.कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही.अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात,अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि.मी.वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला.मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक,मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली. आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले,तलाव, धरणे,डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे.हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की,पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही.देशात अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.यात उत्तराखंड, छत्तीसगड,केरळ, कर्नाटक, ओदिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत.राज्यासह देशात अती पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम रोडच्या खड्ड्यांची दुरूस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रोडच्या वळणावर आवश्यक ते बोर्ड लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे.त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पहाता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले,तलाव,डोह,धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता सेल्फीचा क्रेझ पहाता सावधगिरी बाळगावी अन्यथा सेल्फीचा क्रेझ महागात पडू शकतो.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पान १ व ४ वरुन...

### निधोना येथील सिमेंट...

असा आरोप करण्यात आला आहे की, संबंधित प्रस्ताव मंजूर करण्यासाठी काही अधिकाऱ्यांकडून आर्थिक लाभाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. संबंधित कामामध्ये अपेक्षित टक्केवारी मिळत नसल्यामुळे प्रस्ताव मुद्दाम प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात जिल्हा जलसंधारण अधिकारी सविता सालगर आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे यांची नावे निवेदनात नमूद करण्यात आली असून त्यांनी जाणीवपूर्वक प्रस्तावाला मंजुरी देण्यास टाळाटाळ केल्याचा दावा करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, या प्रस्तावासंदर्भात जिल्हा नियोजन विभागाने संबंधित विभागाला वेळोवेळी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. मात्र, त्या पत्रांकडेही दुर्लक्ष करण्यात आले असून नियोजन विभागाच्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशासनातील दिरंगाई आणि हलगर्जी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या विकासकामांना प्राधान्य मिळत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे. आम आदमी पक्षाने या प्रकरणात दोन वर्षांपासून प्रस्ताव मंजुरीविना का प्रलंबित आहे, याची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून लेखी खुलासा मागविण्याची मागणी केली आहे. तसेच प्रस्ताव तातडीने मंजूर करून काम सुरू करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आम आदमी पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने आगळे-वेगळे व लक्षवेधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या आंदोलनानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीस संबंधित अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकारी किंवा जिल्हा परिषदेची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप उपलब्ध झालेली नाही.

### महापौर, उपमहापौर...

नागरिकाला अडचणीत सोडले जाणार नाही, असे स्पष्ट केले. हायवे रोडवरील पाणी निचऱ्यावर विशेष भर पाहणीदरम्यान प्रभागालगत असलेल्या हायवे रोडवरील पाणी निचऱ्याच्या समस्येवर विशेष चर्चा करण्यात आली. या परिसरात पावसाचे पाणी साचण्याची समस्या वारंवार उद्भवत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. आयुक्त अंजली शर्मा यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून पावसाचे पाणी वेगाने बाहेर जाण्यासाठी नाले, गटारे आणि जलनिस्सारण यंत्रणा सक्षम करण्याचे निर्देश दिले. ज्या ठिकाणी नाल्यांमध्ये गाळ साचला आहे किंवा अडथळे निर्माण झाले आहेत, ते तातडीने हटवून पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तातडीने कामे हाती घेण्याचे आदेश महानगरपालिका प्रशासनाने पाणी साचलेल्या भागांमध्ये आवश्यक यंत्रसामग्री तैनात करून पाणी उपसण्याची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले. तसेच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी दीर्घकालीन जलनिस्सारण आराखडा तयार करण्याबाबतही प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. लोकप्रतिनिधींची उपस्थिती या पाहणी दौऱ्यात नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेविका पद्मा मानधनी, नगरसेवक कल्याण भदणेकर, सामाजिक कार्यकर्ते अजित मानधनी तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. लोकप्रतिनिधींनीही पूरस्थितीची माहिती प्रशासनाला देत विविध भागांतील तातडीच्या समस्यांकडे लक्ष वेधले. नागरिकांना मदतीचे आश्वासन महापौर वंदना मगरे यांनी नागरिकांना धीर देत, महानगरपालिका प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. पाणी निचरा, स्वच्छता, आरोग्य आणि आवश्यक नागरी सुविधा सुरळीत करण्यासाठी सर्व विभागांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले असून पूरग्रस्त नागरिकांना आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध करून दिली जाईल, असे सांगितले. शहरात अद्याप पावसाची शक्यता लक्षात घेता महानगरपालिका प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या असून पूरप्रवण भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

### जालना जिल्हा मध्यवर्ती...

अशी घोषणा केली.

जिल्ह्याच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असून सर्वपक्षीय एकजुटीतून बँकेला अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**कठीण परिस्थितीतून बँकेला उभारी राजेश टोपे**

माजी आमदार राजेश टोपे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेने अत्यंत कठीण आर्थिक परिस्थितीवर मात करून पुन्हा विश्वासार्हता मिळविल्याचे सांगितले. सुमारे २० कोटी रुपयांचे भागभांडवल उभारून बँकेला स्थैर्य देण्यासाठी सर्वांनी संयुक्तपणे प्रयत्न केले. आता नव्या नेतृत्वाखाली बँकेच्या प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नव्या नेतृत्वाला आमदारांचा पाठिंबा**

आमदार संतोष दानवे यांनी शेतकरी, सभासद आणि ग्राहकांना अधिक दर्जेदार बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या प्रत्येक उपक्रमाला आपला सक्रिय पाठिंबा राहील, असे सांगितले.

आमदार नारायण कुचे यांनी युवा नेतृत्वाच्या माध्यमातून बँकेत नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या हितासाठी सर्वजण नव्या नेतृत्वाच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील, असे नमूद केले.

पारदर्शक, आधुनिक आणि शेतकरीहिताचा कारभार करू राहुल लोणीकर

नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी निवडीनंतर सर्व संचालक, लोकप्रतिनिधी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ बँकेला मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. बँकेच्या कारभारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकरी, सभासद आणि ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राज्यातील आदर्श सहकारी बँक बनविण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

**बँक परिसरात जल्लोषाचे वातावरण**

निवडीनंतर बँकेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या शेतकरी, कार्यकर्ते, सहकारी संस्था पदाधिकारी आणि नागरिकांनी राहुल लोणीकर व निर्मलाताई मरकड यांचे पुष्पगुच्छ, हार घालून अभिनंदन केले. उपस्थितांनी नव्या नेतृत्वाकडून सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

**एक कोटी रुपयांची ठेव; आवाहनाला तात्काळ प्रतिसाद**

दरम्यान, माजी मंत्री बबनराव लोणीकर आणि अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तळणी येथील मंठा ग्रामीण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष तथा भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन सरकटे यांनी एक कोटी रुपयांची ठेव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तळणी शाखेत जमा केली.

यावेळी राहुल लोणीकर यांनी नितीन सरकटे यांचा सत्कार करत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि सहकारी संस्थांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेवर विश्वास ठेवून आर्थिक व्यवहार वाढवावेत, असे आवाहन केले.

मान्यवरांची उपस्थिती निवड प्रक्रियेला माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार राजेश टोपे, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी आमदार शिवाजीराव चोथे, माजी अध्यक्ष सतीश टोपे, माजी उपाध्यक्ष भीमराव जावळे, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, तसेच बँकेचे संचालक, संचालिका, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि जिल्हाभरातील शेकडो कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते.

नव्या अध्यक्ष-उपाध्यक्षांच्या बिनविरोध निवडीमुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सर्वपक्षीय सहकार्याचे वातावरण निर्माण झाले असून, शेतकरीहित, आर्थिक सक्षमीकरण आणि सहकार क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देत बँकेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### स्वातंत्र्यदिनानिमित्त...

आणि समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहनही आयोजकांनी केले आहे. मोठ्या संख्येने रक्तदाते सहभागी होतील, असा विश्वास राबता वेल्फेअर ॲण्ड सोशल ग्रुपच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

### एमआयडीसी परिसरातील...

जालना) अवैध धंद्यांवर सुरू राहणार कारवाई पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी पदभार स्वीकारताच अवैध दारू विक्री, जुगार आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात व्यापक मोहीम सुरू केली आहे. एमआयडीसीसारख्या औद्योगिक परिसरात कामगार व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या कारवाईनंतर अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील काळातही अशी विशेष मोहीम सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक स्कॉट, मनसुब वेताळ, राजेंद्र ठाकूर, कृष्णा तंगे, शिवाजी जमधडे, सुभाष पवार, अभिजित वायकोस, शरद पवार, सागर खैरे, रेश्मा गुरुम आणि शैला लोखंडे यांच्या पथकाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, नव्याने पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्याच एका दिवसात अवैध दारू विक्रीविरोधातील सात ठिकाणांवरील छापेमारी आणि त्यानंतर जुगार अड्ड्यावर टाकलेल्या धाडीतून चंदनझिरा पोलिसांनी गुन्हेगारीविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

### एमआयडीसीतील...

आणि एक रिक्षा असा एकूण ६,८८,६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेले आरोपी या कारवाईत पोलिसांनी खालील आरोपींना ताब्यात घेतले आहे. शिवनाथ विठ्ठल चोरमारे (वय ३०, रा. टट्टूपुरा, जुना जालना) गोविंद राधाकिसन शेळके (वय ४८, रा. देऊळगाव राजा रोड, जालना) किरण काळुजी जाधव (वय ३०, रा. दाभाडी, ता. बदनापूर) प्रदीप रामकिसन टेकाळे (वय ३५, रा. यमुना रेसिडेन्सी, जालना) अंकुश संपतराव इंगळे (वय ४९, रा. गोलापांगरी, जालना) शिवा संतोष वाल्हेकर (वय २७, रा. रॉयलनगर, जालना)

सुनील नानाभाऊ आदमाने (वय ४२, रा. एकता चौक, चंदनझिरा, जालना) शे. हफिस शे. गफूर (वय ६५, रा. गांधीनगर, जालना) संतोष शिकारे (वय ५०, रा. ढवळेश्वर, जालना) न्यू जगदंबा ट्रान्सपोर्ट गाळा धारक अवैध धंद्यांविरोधात पोलिसांची मोहीम पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर एमआयडीसी परिसरातील अवैध दारू विक्री, जुगार आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या धाडीनंतर एमआयडीसी परिसरात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांमध्ये खळबळ उडाली असून अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक स्कॉट, मनसुब वेताळ, राजेंद्र ठाकूर, कृष्णा तंगे, शिवाजी जमधडे, सुभाष पवार, अभिजित वायकोस, शरद पवार, सागर खैरे, रेश्मा गुरुम आणि शैला लोखंडे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# श्री तुळजाभवानी देवस्थानच्या १६६८ हेक्टर जमिनींसह अन्य राज्यांतील जमिनींचा तातडीने ताबा घ्यावा; अन्यथा न्यायालयात प्रतिवादी करू!

## हिंदु जनजागृती समितीकडून पुणे विभागीय आयुक्तांना कायदेशीर इशारा

**पुणे - प्रतिनिधी**

श्री तुळजाभवानी देवीच्या महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य प्रदेशातील भाविकांनी अर्पण केलेल्या जमिनींच्या बेकायदेशीर हस्तांतरणप्रकरणी 'हिंदु जनजागृती समिती'ने पुणे विभागीय आयुक्तांना थेट कायदेशीर इशारा दिला आहे. 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम'मधील कलम १८, १९, २१, २२ आणि २२-अ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करून देवीच्या नावे असलेल्या सर्व जमिनींचा प्रत्यक्ष ताबा तातडीने मिळवावा; अन्यथा शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरीत्या प्रतिवादी करून उच्च न्यायालयात नवीन जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे. मंदिराच्या १६६८.१४ हेक्टर जमिनी आणि कोट्यवधी रुपयांच्या दानपेटी घोटाळ्याप्रकरणी हिंदु जनजागृती समितीची जनहित याचिका (क्र. २१/२०१८) मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात प्रलंबित आहे. श्री तुळजाभवानी देवस्थानाच्या हजारो एकर भूखंड घोटाळ्याप्रकरणी



विधिमंडळात महसूलमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने २० जुलै २०२६ रोजी पुणे विभागीय आयुक्त श्रीमती शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे.

या समितीला हिंदु जनजागृती समितीच्या वतीने खटला लढवणारे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी सविस्तर कायदेशीर नोटीस वजा निवेदन सादर केले. हे निवेदन देताना अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी, अधिवक्ता उमेश भडगावकर, तसेच पुणे येथून अधिवक्ता (सौ.) मुग्धा बिवलकर आणि अधिवक्ता (सौ.) सुनंदा येवले उपस्थित होत्या. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह अनेक हिंदु राजे आणि देशभरातील भाविकांनी श्री तुळजाभवानी देवीला मोठ्या प्रमाणावर जमिनी दान दिल्या होत्या. खुद्द निजामाच्या गॅझेटिअरमध्येही देवीच्या नावे १६६८.१४ हेक्टर जमिनीची अधिकृत नोंद आहे; मात्र १९६२ मध्ये मंदिराचे नियंत्रण शासनाकडे आल्यानंतर मूळ जमिनींचे संरक्षण आणि पुनर्प्राप्ती यासाठी आवश्यक ती कोणतीही प्रभावी कारवाई झालेली नाही. उलट हजारो हेक्टर जमीन पूर्वीपासूनच चार मठांच्या ताब्यात असल्याचे चित्र निर्माण करून मूळ जमिनींच्या प्रश्नाकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप समितीने केला आहे. प्रशासनाने आता केवळ चौकशीचे सोपस्कार न करता, कायद्यातील अधिकारांचा थेट वापर करून सर्व नोंदींची सखोल पडताळणी करावी आणि बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी पुन्हा देवस्थानच्या नावे नोंदवून त्यांचा प्रत्यक्ष ताबा मिळवावा, अशी ठाम मागणी या वेळी करण्यात आली.

७ जानेवारी २०१० रोजी विधी व न्याय विभागाचे तत्कालीन सहसचिव एम. जी. गिरटकर यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालाकडेही प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. तसेच, धाराशिवच्या अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समिती आणि तुळजापूर देवस्थानच्या अध्यक्षांनाही यापूर्वी कायदेशीर आक्षेप सादर करण्यात आले होते. देवस्थानची मालमत्ता सुरक्षित करण्यासाठी तातडीने कायदेशीर कारवाई न केल्यास, या निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक तसेच अधिकृत क्षमतेत प्रतिवादी करून उच्च न्यायालयात नवीन जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असे हिंदु जनजागृती समितीने स्पष्ट केले आहे.

# जुने पाण्याचे स्रोत पुनर्जीवित करून टंचाई आराखड्यात समावेश करा -मंत्री आदिती तटकरे

**मुंबई - प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रत्येक गावासाठी स्वतंत्र सूक्ष्म नियोजन करावे. तसेच संबंधित गावातील पाण्याचा स्रोत, नाले, बंधारे, साठवण तलाव आणि इतर जलस्रोतांचा अभ्यास करून भविष्यात पाणीटंचाई निर्माण होणार नाही, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या. श्रीवर्धन तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी रायगड जिल्हाअधिकारी किशन जावळे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी, कार्यकारी अभियंता यावेळी उपस्थित होते. यावेळी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या गावांचा, जलजीवन मिशनच्या कामांच्या प्रगतीचा तसेच भविष्यातील दीर्घकालीन उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यातील गावांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी उपलब्ध जलस्रोत निश्चित करणे, बंधारे व साठवण तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आदी कामे हाती घ्यावीत, जेणेकरून पावसाच्या पाण्याची योग्य साठवण होईल.

जलजीवन मिशन योजनांच्या परिसरातील टंचाईग्रस्त गावांची निश्चिती करून पाणीटंचाईची कारणे, उपलब्ध साधनसामग्री, आवश्यक उपाययोजना आणि त्यासंदर्भातील सर्व माहिती संकलित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कृषी विभाग, वन विभाग आणि जलसंवर्धन विभाग यांच्या समन्वयातून ही कामे हाती घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत. श्रीवर्धन तालुक्यात सध्या २८ गावे आणि ३६ वाड्या पाणीटंचाईच्या समस्येने प्रभावित असून, प्रत्येक गावासाठी स्वतंत्र सूक्ष्म नियोजन करून दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी दिले. टँकर सुरू असलेल्या प्रत्येक गावाची स्वतंत्र माहिती तयार करून त्या गावांमधील जलजीवन मिशन योजनांच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला. शासनाच्या नव्या निर्देशानुसार २५ टक्क्यांपेक्षा कमी प्रगती झालेल्या जलजीवन मिशन योजनांना प्राधान्य देऊन त्यांचे नियोजन करावे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

# महाराष्ट्राचा पर्यटन ब्रँड अधिक प्रभावी करण्यासाठी डिजिटल प्रसिद्धीवर भर - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा पर्यटन ब्रँड राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी डिजिटल प्रसिद्धी, प्रभावी जनसंपर्क आणि नाविन्यपूर्ण माध्यमांचा व्यापक वापर करणे आवश्यक आहे. राज्याची समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा आणि नैसर्गिक वैभव आधुनिक माध्यमांतून जगासमोर प्रभावीपणे मांडले गेले पाहिजे, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. पर्यटन संचालनालयामार्फत २०२६-२७ या वर्षातील जनसंपर्क विभाग आणि सामाजिक माध्यमांअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा सविस्तर आढावा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे घेण्यात आला. या बैठकीस पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, सहसंचालक संतोष जाधव, सहायक संचालक रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता आकाश चकोर तसेच संबंधित मीडिया एजन्सींचे प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत महाराष्ट्र पर्यटनाच्या प्रसिद्धी, जनसंपर्क आणि सामाजिक माध्यमांवरील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पर्यटकांना अचूक, विश्वासार्ह आणि आकर्षक माहिती वेळेत उपलब्ध करून देणे, पर्यटन विभागाची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करणे तसेच राज्यातील पर्यटनस्थळांची देश-विदेशात प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा अधिक परिणामकारक वापर करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी नाविन्यपूर्ण जनजागृती मोहिमा, दर्जेदार डिजिटल आशय निर्मिती, सामाजिक माध्यमांवरील प्रभावी धोरण, माध्यमांमधील समन्वय तसेच पर्यटनविषयक माहितीचे नियोजनबद्ध आणि वेळेवर प्रसारण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची वैशिष्ट्ये अधिक प्रभावीपणे पर्यटकांपर्यंत पोहोचविणे, राज्याचा पर्यटन ब्रँड अधिक सक्षम करणे आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने महाराष्ट्राची पर्यटन क्षेत्रातील स्पर्धात्मक ओळख अधिक दृढ करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

# अपघाती अपंगत्वाच्या कारणावरून घटस्फोट मागणे अमानवी; मद्रास उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**विशेष प्रतिनिधी / वृत्तसेवा**

चेन्नई: अपघातात दुखापत किंवा अपंगत्व आल्याच्या केवळ कारणावरून कोणत्याही व्यक्तीला वैवाहिक जीवनासाठी अयोग्य ठरवता येणार नाही आणि असा दृष्टिकोन बाळगणे म्हणजे आरोग्यविषयक समस्या असलेल्या व्यक्तींशी भेदभाव करणे व अमानवीपणाचे प्रदर्शन करणे आहे, असा महत्त्वपूर्ण आणि अत्यंत दिलासादायक निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती आनंद व्यंकटेश आणि न्यायमूर्ती के. के. रामकृष्णन यांच्या खंडपीठाने यू विरुद्ध एम ६७१ २०२०, या प्रकरणात पतीचे अपील फेटाळताना स्पष्ट केले की, शारीरिक अपंगत्व किंवा अपघातातील दुखापतीमुळे कोणतीही व्यक्ती आनंदी वैवाहिक जीवन जगण्यास अयोग्य ठरत नाही, उलट अशा परिस्थितीत जोडीदाराला सहानुभूती, पाठिंबा आणि प्रेमाची गरज असते. या प्रकरणात अपीलकर्त्या पतीतर्फे ॲड. आर. व्यंकटेशन (मेसर्स राईट लॉ असोसिएट्स) यांनी, तर प्रतिवादी पत्नीतर्फे ॲड. जी. एस. अशोक आदित्यन यांनी बाजू मांडली.

या प्रकरणातील पती-पत्नीचा विवाह २०१० मध्ये झाला होता आणि २०११ मध्ये त्यांना एक मुलगा झाला. पत्नीचा लग्नाआधी रस्ता अपघात झाला होता, ज्यामध्ये तिची कंबर गंभीररीत्या दुखावली गेली होती. पतीने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज करताना असा दावा केला होता की, पत्नीला या अपंगत्वामुळे नैराश्य आले असून ती वैवाहिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास असमर्थ आहे आणि लग्नाआधी हे अपंगत्व लपवून ठेवल्यामुळे वैवाहिक जीवनात वाद निर्माण झाले. कौटुंबिक न्यायालयाने घटस्फोट देण्यास नकार दिल्यानंतर पतीने मद्रास उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. उच्च न्यायालयाने सर्व पुराव्यांची पाहणी करून पतीचा दावा फेटाळून लावला आणि स्पष्ट केले की हिंदू विवाह कायद्यात शारीरिक दुखापत लपवणे हे घटस्फोटाचे कारण असू शकत नाही, तसेच लग्नानंतरही दोघांचे वैवाहिक जीवन सुरू होते आणि पत्नीने तिच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या आहेत.

न्यायालयाने अत्यंत कठोर शब्दांत टिप्पणी करताना सांगितले की, अपंगत्वाच्या आधारावर एखाद्या व्यक्तीशी भेदभाव करणे हे समानता आणि सन्मानाच्या संवैधानिक मूल्यांच्या विरोधात आहे.

# शिक्षकांनी नवी आव्हाने स्वीकारण्याची तयारी ठेवावी :- आशाताई आकात

**मंठा - प्रतिनिधी**

अलीकडील काळात शिक्षण क्षेत्रामध्ये नवी आव्हाने निर्माण होत आहेत ही आव्हाने पेलण्यासाठी शिक्षकांनी अपडेट राहण्याचे आवाहन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात यांनी केले.

स्वामी विवेकानंद महाविद्यालय मंठा येथील प्रा. एकनाथ आघाव व प्रा.प्रल्हाद उगले हे सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवा गौरव समारंभ संस्थेच्या वतीने महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता येणारी नवीन पिढी तयार करण्यासाठी शिक्षकांनी ज्ञान अद्यावत करावे व नवीन उपक्रम राबवून त्यांना देशाच्या विकासासाठी तयार करावे असे आवाहन आशाताई आकात यांनी सर्व शिक्षकांना केले. या सेवा गौरव कार्यक्रमात बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुधाकर जाधव यांनी



दोन्ही सेवा गौरव सत्कारमूर्ती उगले सर व आघाव सर यांनी केलेल्या कामाचा आढावा घेताना सांगितले की एक शिक्षक आपल्या नोकरीच्या कार्य काळामध्ये अनेक पिढ्या ज्ञानदान करून घडवत असतो त्यामुळे समाजामध्ये शिक्षकाला अत्यंत मानाचे स्थान आहे .त्यामुळे शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या बदलाकडे डोळसपणे बघितले पाहिजे व आपल्या अध्यापनात नवनवीन बदल करून एक सक्षम समाज घडवला पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य सुधाकर जाधव उपप्राचार्य संभाजी तिडके माजी प्राचार्य मोरे नाना प्रा खरात सर प्रा. डी. आर. जाधव सोन्याबापु चव्हाण सर ,सुभाष खराबे, सर ए.एल. मगर सर ,डहाळे मॅडम, शिवाजीराव शिंदे ,फुटाणे सर ,या माजी शिक्षकासह सत्कारमूर्ती प्राध्यापक आघाव सर, उगले सर ,मस्के सर ,रंजवे सर, टी एम खरा सर, एनडी खरात सर ,संदेश राठोड सर ,नरोटे सर ,देशमुख मॅडम ,गायकवाड मॅडम, श्रीकांत खेडेकर सर व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य संभाजी तिडके यांनी केले सूत्रसंचालन श्रीमती पाटील मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा पंढरीनाथ काकडे यांनी केले.

# राज्यात एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यात युवक-युवतींना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले जाणार आहे. या रोजगार मेळाव्यांची व्यापक माहिती गरजू तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणे गरजेचे असल्याचे मत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्यस्तरीय रोजगार मेळावा समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष डॉ. रणजित पाटील, सदस्य डॉ. सरोजिनी राऊत, रविंद्र देशपांडे, विशाल टिब्रेवाल, जयेश ढाके, राहुल खोले, सदस्य सचिव तथा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ.अमित सैनींसह शासकीय सदस्य उपस्थित होते. मंत्री लोढा म्हणाले की, आयटीआय व्यतिरिक्त इतर कॉलेजमधील विद्यार्थी, अपस्किलिंगची गरज असणारे तरुण आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधून रोजगार मेळाव्याच्या संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करावी.

तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयात व तालुक्यात याची माहिती दिली जाईल. तरुणांना रोजगाराचे महत्व आणि स्वरोजगाराचे फायदे पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती व एनजीओंच्या माध्यमातून समुपदेशन केले जाईल.

# तोरणमाळ जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित करू- पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई - प्रतिनिधी**

दि. ५ : तोरणमाळचा पर्यटन विकास शाश्वत, नियोजनबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करताना तेथील नैसर्गिक वारसा जपत पर्यटकांसाठी आधुनिक व दर्जेदार सुविधा निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर राहील, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याबाबत केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आढावा बैठक पर्यटन मंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. या बैठकीस आमदार आमश्या पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, सहसंचालक संतोष जाधव, सहायक संचालक रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता आकाश चकोर तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे नंदुरबार जिल्हाधिकारी, नाशिक पर्यटन विभागाचे उपसंचालक आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याच्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तोरणमाळचा पर्यटन विकास नियोजनबद्ध, शाश्वत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावा, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या ११ हेक्टर ५६ आर जागेची तातडीने मोजणी करून तिची चतुःसीमा निश्चित करण्याच्या सूचना नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नाशिक विभागातील अधिकाऱ्यांनी आवश्यक पाठपुरावा करून संबंधित जागेचे नकाशे व चतुःसीमा एका महिन्याच्या आत निश्चित करावेत, असे निर्देशही पर्यटन मंत्री देसाई यांनी दिले.

तोरणमाळचा नैसर्गिक, जैववैविध्यपूर्ण आणि पर्यटनदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण वारसा जपत आधुनिक सुविधा, पर्यावरणपूरक विकास, पर्यटन पायाभूत सुविधा आणि पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या विविध घटकांचा समावेश पर्यटन विकास आराखड्यात करण्यात यावा, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणारा प्रस्ताव सर्वंकष, परिणामकारक आणि भविष्यातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने सक्षम असावा, यावरही बैठकीत भर देण्यात आला.

# रायगड जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे जन्मदाखले तातडीने उपलब्ध करा -मंत्री आदिती तटकरे

**मुंबई - प्रतिनिधी**

पाणीटंचाई, शिक्षकांची रिक्त पदे, आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रलंबित जन्मदाखले तसेच स्थानिक विकासकामांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावून नागरिकांना दिलासा द्यावा, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले. मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीत परिसरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न प्राधान्याने चर्चिला गेला. यावेळी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे दूरदृश्यप्रणालीद्वारे आणि उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी, स्थानिक बैठकीत उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे शिक्षण व विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर महसूल, ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाने समन्वय साधून पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना जन्मदाखले तातडीने उपलब्ध करून द्यावेत. तालुक्यात १०४ शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्याची प्रक्रिया सुरू करावी. तसेच उन्नतीवाडी, केंद्र शाळा नागोठणे आणि माहुळगे आदिवासीवाडी येथील शाळांमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गांना मंजुरी देण्यात देण्यासाठी कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकण्याच्या प्रस्तावावर यावेळी चर्चा झाली. सुमारे दोन किलोमीटर अंतरासाठी जी.आय. पाइपलाइन एचडीपीई पाइपलाइन तसेच काँक्रीट ब्लॉक्सचा वापर करण्यासह आवश्यक तांत्रिक बाबींचा आढावा घेण्यात आला. पाणीटंचाईच्या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले.

याशिवाय स्थानिक विकासकामे, आरोग्य, पाणीपुरवठा आणि शिक्षणाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित समस्या प्राधान्याने सोडवून त्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.

# जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर, उपाध्यक्षपदी निर्मलाताई मरकड यांची बिनविरोध निवड

## सर्वपक्षीय एकजुटीचे दर्शन; शेतकरीहित, बँकेची आर्थिक बळकटी आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) सर्वानुमते आणि बिनविरोध पार पडली. अध्यक्षपदी राहुल बबनराव लोणीकर, तर उपाध्यक्षपदी सौ. निर्मलाताई दीपकराव मरकड यांची बिनविरोध निवड झाली. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रासाठी ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात असून, विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येत नव्या नेतृत्वाला शुभेच्छा देत बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

निवड प्रक्रियेसाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू रोडगे यांनी अध्यासी अधिकारी म्हणून कामकाज पाहिले, तर बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी निवड प्रक्रिया सुरळीत पार पाडली. सहकार क्षेत्राला बळ देण्यासाठी संस्थांची खाती बँकेकडे वळविण्याचा प्रयत्न रावसाहेब दानवे निवडीनंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेची आर्थिक ताकद वाढविण्यासाठी सहकारी साखर कारखाने, विविध सहकारी संस्था तसेच इतर संस्थांचे आर्थिक व्यवहार जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी नव्या संचालक मंडळाने पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभार करावा, असे आवाहन त्यांनी केले.



जिल्ह्यातील सहकार चळवळीला नवे बळ देण्यासाठी सर्व संस्थांनी जिल्हा बँकेवर विश्वास ठेवावा, असेही त्यांनी नमूद केले. देशातील सर्वात मोठी कर्जमाफीचा दावा;

**जालन्यास २,१९५ कोटींचा लाभ बबनराव लोणीकर**

माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख करत २०१७ मध्ये ३४ हजार २२ कोटी रुपयांची तर २०२६ मध्ये ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात आल्याचा दावा केला. या कर्जमाफीत जालना जिल्ह्याला २,१९५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार असून त्यातील सर्वाधिक वाटा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा असल्याचे त्यांनी सांगितले. या आर्थिक मदतीमुळे बँकेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि बाजार समित्यांची खाती बँकेकडे वळविण्याचे प्रयत्न अर्जुनराव खोतकर

माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जिल्हा परिषद, पंचायत समित्या तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांची खाती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे वळविण्यासाठी प्रयत्न केले जातील *(पान २ वर)*

---

# स्वातंत्र्यदिनानिमित्त राबता वेल्फेअर ॲण्ड सोशल ग्रुपतर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

### नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, आयोजकांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने राबता वेल्फेअर ॲण्ड सोशल ग्रुप, जालना यांच्या वतीने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील अक्सा फंक्शन हॉल, युसुफ कॉलनी, जुना जालना येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे शिबिर आयोजित करण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रक्तदान हे सर्वोत्तम समाजसेवेचे कार्य मानले जाते. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, थॅलेसेमिया, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी अशा रक्तदान शिबिरांचे महत्त्व मोठे आहे. हीच सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन राबता ग्रुपने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

हे रक्तदान शिबिर ज्येष्ठ समाजभूषण अयुबखान साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून राबता ग्रुपचे अध्यक्ष सलीम पठाण यांच्या प्रमुख पुढाकारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास बप्पासाहेब गोल्डे पाटील, माजी सभापती ॲड. किशोर राऊत, ॲड. तायडे साहेब, ॲड. गणेश राऊत, विठ्ठलसिंग राजपूत (राणा), नगर परिषद अंबड, समाजसेवक मोहन इंगळे, डॉ. रमेश चव्हाण (अंबड), रविंद्र गोल्डे पाटील, श्रीरामराजे खरात, सचिन कांबळे (नंदू), राजू तनपुरे (पांडे), फापे साहेब, अहमद शेख, मगर साहेब आणि सुभाष हिवाळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आयोजकांनी सर्व धर्म, जात आणि समाजातील नागरिकांना या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ''रक्तदान हे जीवनदान'' या भावनेतून प्रत्येक निरोगी व्यक्तीने स्वेच्छेने रक्तदान करून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान देण्यास हातभार लावावा, असे आवाहन राबता वेल्फेअर ॲण्ड सोशल ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

रक्तदान शिबिरात सहभागी होण्यासाठी इच्छुक रक्तदात्यांनी पूर्वनोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधता येणार आहे. सलीम यासीनखा पठाण ९४२२२१३३९०, शेरजमा खान ९६०४३७८८४ डॉ. जावेद पठाण ९१७२७२४४३२, डॉ. अजिम शेख ९७६६९७५३८८, अनस चाऊस ९५९५५७११३७, डॉ. अख्तर शेख ९८९०४४८७८६

ॲड. शहेबाज पठाण ७३८५१५१०५४, सलीमभाई कॉन्ट्रॅक्टर ९०४९४६९७८६, रक्ताची गरज कोणालाही, कधीही भासू शकते. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाचा उत्सव केवळ ध्वजारोहणापुरता मर्यादित न ठेवता रक्तदानासारख्या मानवतावादी उपक्रमातून साजरा करावा *(पान २ वर)*

---

# एमआयडीसी परिसरातील अवैध दारू विक्रीवर चंदनझिरा पोलिसांचा प्रहार

## *एकाच दिवशी सात ठिकाणी छापेमारी; सात आरोपींवर गुन्हे, ३० हजार १०० रुपयांची देशी-विदेशी व हातभट्टी दारू जप्त*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील एमआयडीसी परिसरात लपूनछपून सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात चंदनझिरा पोलिसांनी मोठी कारवाई करत एकाच दिवशी सात ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत सात जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून देशी दारू, विदेशी मद्य तसेच गावठी हातभट्टीची दारू असा ३० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींविरुद्ध दारूबंदी कायद्यानुसार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नव्याने चंदनझिरा पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर



भूमिका घेत विशेष मोहीम सुरू केली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्याच काही तासांत त्यांनी स्वतः एमआयडीसी परिसरात पाहणी करत गुप्त माहितीच्या आधारे कारवाईचे नियोजन केले.

सात ठिकाणी एकाचवेळी धाड ४ ऑगस्ट २०२६ रोजी एमआयडीसी परिसरातील विविध भागांत चोरट्या मार्गाने सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यांची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने सात वेगवेगळ्या ठिकाणी एकाचवेळी छापेमारी केली. या कारवाईदरम्यान सात आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याकडून देशी दारू, विदेशी मद्य आणि गावठी हातभट्टीची दारू असा एकूण ३०,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कारवाईतील आरोपी पोलिसांनी खालील आरोपींविरुद्ध कारवाई केली आहे. सुरेश दगडू गवारे (वय ३०, रा. कुंभेफळ, ता. जि. जालना, सध्या साई ढाबा, एमआयडीसी) रतन बाबुराव साळवे (वय ५०, रा. पाचनवडगाव, सध्या एमआयडीसी)

सोपान रमेश सोळुंके (वय २२, रा. सुंदरनगर, चंदनझिरा) वैभव पांडुरंग उंडे (वय २६, रा. बोधलापुरी, ता. घनसावंगी, सध्या एमआयडीसी) राज टेकबहादूर सुनार (वय ४३, रा. ६० फूटी रोड, चंदनझिरा) धनंजय जानकीराम देव्हढे (वय ४९, रा. काद्राबाद, जालना) एक महिला आरोपी (रा. चंदनझिरा *(पान २ वर)*

---

# एमआयडीसीतील ट्रान्सपोर्ट कंपनीच्या गाळ्यावर चंदनझिरा पोलिसांचा छापा; जुगार अड्डा उद्ध्वस्त

### ०९ जणांवर गुन्हा दाखल; रोख रक्कम, मोबाईल, मोटारसायकली व रिक्षासह ६ लाख ८८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील एमआयडीसी परिसरात एका ट्रान्सपोर्ट कंपनीच्या गाळ्यामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर चंदनझिरा पोलिसांनी धाडसी कारवाई करत नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली आणि एक रिक्षा असा एकूण ६ लाख ८८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नव्याने चंदनझिरा पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी केलेली ही पहिली मोठी कारवाई मानली जात आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी पोलीस निरीक्षक किरण बिडवे हे एमआयडीसी परिसरात लपूनछपून सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीच्या ठिकाणांची पाहणी व कारवाई करत होते. त्यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की, न्यू जगदंबा ट्रान्सपोर्ट या गाळ्यामध्ये काही जण ''झन्ना-मन्ना'' नावाचा जुगार खेळत आहेत.

या माहितीची खातरजमा करून पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथकासह संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी गाळ्यात सुरू असलेला जुगार रंगेहाथ पकडत तेथील आठ जुगारींना ताब्यात घेतले. तसेच जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या गाळा धारकालाही आरोपी करण्यात आले.


या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल हँडसेट, मोटारसायकली *(पान २ वर)*

---

# धाकलगावात वीजेच्या धक्क्याने चार वर्षांच्या गाईचा मृत्यू

**धाकलगाव - प्रतिनिधी**

येथील शेतकरी दिगांबर आसाराम शेडगे यांच्या चार वर्षांच्या गाईचा विजेच्या डीपीचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गावाला वीजपुरवठा करणाऱ्या डीपीच्या तांत्रिक बिघाड होऊन पोलमध्ये वीज उतरल्याने हा अपघात घडला. मंगळवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे. शेतकरी दिगांबर शेडगे यांची चार वर्षांची गाय नेहमीप्रमाणे चरत असताना गावातील वीज डीपी जवळ गेली डीपीमध्ये आधीपासूनच वीज उतरलेली असल्याने गाईला



विजेचा जोरदार झटका बसला आणि तिचा जागीच मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतकरी याची अत्यंत सामान्य परिस्थितीतील असून या दुर्दैवी घटनेमुळे त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे महावितरण विभागाने आणि प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन पीडित शेतकऱ्याला तातडीने योग्य ती भरपाई द्यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

---

# सीना नदी परिसर विकास प्रकल्पाचे भूमिपूजन; वृक्षारोपण, वॉकिंग ट्रॅक, घाटाची उभारणी होणार

## *पोलाद स्टीलकडून सीएसआर अंतर्गत २१ लाखांची देणगी*

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील सीना नदी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घेण्यात आलेल्या सीना नदी परिसर विकास प्रकल्पाचे भूमिपूजन बुधवार दि. ५ ऑगस्ट रोजी जालना महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या हस्ते संपन्न झाले.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पोलाद स्टीलचे रो. सतीश अग्रवाल यांनी कंपनीच्या सीएसआर निधीतून



२१ लाखांची देणगी दिली आहे. या निधीतून परिसरात वृक्षारोपण, नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक, नदीकाठी घाटाची उभारणी तसेच अन्य आवश्यक नागरी सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे सीना नदी परिसराचे सौंदर्यीकरण होण्यासह नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. प्रशांत महाजन, प्रकल्प प्रमुख रो. सुरेश मगरे, रो. रमेश मगरे, रो. वर्षा पिती, रो. प्रमोद झांजरी, रो. सुनील रायठ्ठा, रो. दीपक बगडिया, रो. विनोद मोतीवाला, रो. राजेश बजाज यांच्यासह रोटरी क्लबचे सदस्य, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# सतीश घाटगे यांच्या पाठपुराव्याला यश : चित्रवडगावातील शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी

**घनसावंगी - प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला चित्रवडगाव शिवारातील पांदण रस्त्याचा महत्त्वाचा आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न अखेर निकाली निघाला आहे. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या पाठपुराव्यामुळे तालुका प्रशासनाने कार्यवाही करत हा रस्ता मोकळा केला. चित्रवडगाव येथील शेतकरी आणि गावकऱ्यांसाठी पांदण रस्ता हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. या रस्त्याअभावी शेतकरी व ग्रामस्थांची मोठी




गैरसोय होत होती. गेल्या ६ महिन्यांपासून तुकाराम सोसे, श्रीमंत बप्पा पोकळे, सरपंच गजानन सोसे, बबनराव उघडे आणि स्थानिक शेतकरी बांधवांनी सतीश घाटगे यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा घनसावंगी विधानसभा निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांनी विशेष लक्ष घालून या प्रश्नाला गती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रशासकीय पातळीवर हा विषय तडीस नेणे शक्य झाले. घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन रस्ता मोकळा करून दिला. त्यांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे गावकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गावकऱ्यांची अडचण समजून घेऊन स्वतः प्रत्यक्ष जागेवर येत रस्ता मोकळा करून दिल्याबद्दल घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांचे सर्व शेतकरी व चित्रवडगावमधील ग्रामस्थांनी आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.